# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ५१** **दि. ०१/०८/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०१/०८/२०२३ मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सदस्य विशेष महासभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | |
|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सोनवणे अश्विन शांताराम | **स्विकृत सदस्य** |
| ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह | महेश रतन चौधरी |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | |

सदर विशेष महासभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव तथा सहा.आयुक्त, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त श्रीमती अश्विनी गायकवाड, सहा.आयुक्त (आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सभा लवकर सुरु करण्यात यावी आणि कोरम नाही तर सभा होईल की नाही याचा पण खुलासा करा.

**मा.महापौर :-** सभा सुरु करण्यापुर्वी सर्वांनी वंदे मातरम्‌साठी उभे राहावे.

(सन्मा.सदस्य १. सन्मा.सदस्या कोल्हे सिंधु विजय २. सन्मा.सदस्य कोल्हे ललित विजय ३. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ यांनी मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांचेकडेस सदर सभेस रजेवर असलेबाबत रजेचे अर्ज दिलेले असुन ते मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी करुन मान्य केलेले आहेत.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** महासभेला कोरम पुर्ण झालेला दिसत नाही तर कोरम अभावी महासभा तहकुब करावी अशी मी आपणास विनंती करतो.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** अश्विनभाऊच्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** माझा लेखी खुलासा स्विकारण्यात यावा व त्याची नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**मा.महापौर :-** मा.आयुक्त मॅडमांनी दिलेला खुलासा याची इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी. विशेष महासभा ही चालविण्या करीता कोरम पुर्ण असणे आवश्यक आहे. परंतु सभागृहामध्ये कोरम पुर्ण झालेला नसल्यामुळे सदरील विशेष महासभा सन्मा.सदस्य श्री.अश्विनभाऊ सोनवणे आणि सन्मा.सदस्या सौ.शुचितातार्इ हाडा यांच्या सुचनेनुसार सदरील विशेष महासभा ही अनिश्चित काळासाठी तहकुब करण्यात येत आहे.

(यावेळी जळगांव शहर महानगरपालिकेचे मा.आयुक्त डॉ.सौ.विद्या गायकवाड यांनी जा.क्र./जमनपा/आ.का./९७३/२०२३ दि.३१/०७/२०२३ अन्वये दि.०१/०८/२०२३ रोजी सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांना लेखी खुलासा सादर केलेला असुन तो मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांनी स्विकृत केलेला असुन त्यांनी इतिवृत्तात नोंद घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.खुलासा खालील प्रमाणे)

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**

जा.क्र./जमपा/आ.का./९७३/२०२३
दि.३१/०७/२०२३

**प्रति,**
**मा.महापौर,**
जळगांव शहर महानगरपालिका,
जळगांव

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेचे आयुक्त, डॉ.सौ. विद्या गायकवाड, यांचेवरील अविश्वास प्रस्तावाबाबत सन्मा.सदस्य श्री.अश्विन शांताराम सोनवणे व इतर सन्मा.सदस्यांनी दि.२८/०७/२०२३ रोजी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे बाबत - अहवाल तथा खुलासा सादर.

**संदर्भ :-** विशेष महासभा सुचना विषयपत्रिका क्र.५१ दि.२८/०७/२०२३ बाबत

**आदरणीय महोदया,**

दि.२७/०७/२०२३ च्या पत्रान्वये त्वरीत महासभा बोलावुन सदरील अविश्वास प्रस्ताव सभेच्या अजेंडयावर घेवुन डॉ.विद्या गायकवाड, आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचेवर अविश्वास ठराव संमत करण्या बाबत मागणी केलेली आहे. यात त्यांनी शहराची स्थिती बघता शहर समस्यांनी ग्रस्त असे शहर दिसते, प्रत्येक विकास कामात खोडा घालण्याचा प्रयत्न प्रशासनाकडुन होतो असे नमुद केलेले आहे. या अनुषंगाने खालील वस्तुस्थिती निष्ठ माहिती सादर करण्यात येत आहे.

१. बांधकाम विभागामार्फत विकास कामे :- शहरातील विकास कामे विविध शासकीय योजना व मनपा फंड अंतर्गत होत असतात यामध्ये मी आयुक्त म्हणुन रुजु झाल्यापासुन खालील नमुद योजना अंतर्गत कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

(आकडे कोटीत)

| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** | **२०२२-२३** | **२०२३-२४** |
|---|---|---|---|
| १ | मनपा निधी | १०.९२ | ११.५९ |
| २ | दलीत्तेतर | २.३८ | ७.७७ |
| ३ | दलीतवस्ती | १५.८९ | -- |
| ४ | नगरोत्थान | ८.८० | ०.८४ |
| ५ | मुलभुत सोयी सुविधा | २४.२२ | -- |
| | | ६२.२१ | २०.२ |
| | **एकत्रित एकुण** | **८२.४१** | |

म्हणजेच मागच्या एका आर्थिक वर्षात ६२.२१ कोटीचे कार्यारंभ आदेश व आर्थिक वर्षात अवघ्या ४ महिन्यात रुपये २०.२ कोटीचे असे एकुण ८२.४१ कोटीचे कार्यारंभ आदेश रस्ते, गटार, पथदिवे, उद्यान विकास, या विकास कामांकरीता कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

२. पाणी पुरवठा विभाग :- शहरात अमृत योजनेचे काम अंतीम टप्यात असुन आज पर्यंत नळ कनेक्शन अंदाजे ७५००० अमृत अंतर्गत पाणी पुरवठा ३७००० सुरु केलेला आहे. १५००० कनेक्शन Test / Trial झाले आहेत. येत्या २ महिन्यात सदरील योजना पुर्ण होवुन शासनाला तसे कळविण्यात येईल.

पाणी पुरवठा व मलनिस्सारण सल्लागार नेमणुकी बाबत दि.०७/०७/२०२३ रोजी ठराव पारित करुन घेतलेला असुन करारनामा प्रक्रियेत प्रकरण असुन लवकरच त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात येतील.

३. घनकचरा प्रकल्प :- दि.११.१०.२०१७ ला प्रथम DPR मंजुर करण्यात आला होता. दि.२४.०७.२०२३ रोजी पुनश्च काम करण्याचे पत्र दिलेले आहे. जवळपास ५ वर्षापासुन रखडलेला घनकचरा प्रकल्प आवश्यक अशी सर्व कायदेशीर बाबी तपासुन सुरु करण्याचे प्रयत्न केलेले आहे.

४. बायोमायनिंग - दि.१०.०८.२०२२ शासन निर्णयानुसार बायोमायनिंग प्रकल्प मंजुर झालेला असुन दि.२५.०७.२०२३ रोजी ६.८४ कोटीचे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

आजपर्यंत माझ्या आयुक्त पदाच्या काळात साफ-सफाई कंत्राटदास रु.१.०६ कोटी रुपयाची कठोर दंडात्मक कारवाई करुन दैनंदिन साफसफाईसाठी पाठपुरावा केलेला आहे.

५. इतर विभागांची कामे :- दिव्यांग कल्याण विभागांतर्गत दिव्यांगांकरीता ३३.१९ लाख निधी खर्च केलेला आहे.

महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत मनपाच्या इतिहासात पहिल्यांदाच इयत्ता १० व १२ चे पिवळे रेशनकार्डधारक विद्यार्थीनींना अनुक्रमे रु.१०,०००/- व रु.१५०००/- शिष्यवत्ती दिलेली आहे या अंतर्गत ८.६५ लाख रुपये खर्च केलेला आहे.

६. मालमत्ता वसुली तुलनात्मक तक्ता

२०२१-२२ - रु.५२.९७ कोटी

२०२२-२३ - रु.१११.६१ कोटी

म्हणजे माझ्या आयुक्त पदाच्या कार्यकाळात दुप्पटीने वसुलीत वाढ केलेली असुन म्हणुन जळगांव शहर महानगरपालिका १५ वित्त आयोगाच्या अनुदानासाठी पात्र झालेली आहे.

७. अर्थ विभाग :- मी आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यानंतर खालील विकास कामांची देयके व वेतन / पेन्शन देण्यात आले.

(आकडे कोटीत)

| अ.क्र. | योजनेचे नाव | २०२२-२३ | २०२३-२४ (४ महिने) |
|---|---|---|---|
| १ | नगरोत्थान शासन हिस्सा | ६.१९ | ६.४३ |
| २ | नगरोत्थान मनपा हिस्सा | ४.६३ | १.९० |
| ३ | दलीतवस्ती | ५.५८ | १.९७ |
| ४ | दलीत्तेतर | १०.०२ | ६.३८ |
| ५ | मनपा निधी (वेतनासह) | २०४.७५ | १०१.०० |
| | **एकुण** | **२३१.१७** | **११७.६८** |

८. सर्व साधरण माहिती :-

मी आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यापासुन सर्व कर्मचारी यांचे वेतन दरमहा ५ तारखेच्या आत केले जाते. जवळपास ५८ पेन्शनर्सला रु.१०.६८ लक्ष वेतन निवृत्ती लाभ दिले आहेत.

साफसफाई कामगारांना मागील २० वर्षानंतर प्रथमच गणवेश (ड्रेस / साडी) देण्यात आले.

सर्व अधिकारी / कर्मचारी यांना गणवेश प्रक्रिया सुरु केली जेणे करुन कर्मचाऱ्यात शिस्तीचे वातावरण रहावे. माझ्या काळात अंदाजे ११ कर्मचारी यांचेवर शिस्तभंगानुसार निलंबनाची कार्यवाही केली, २२ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिल्या व २५ कर्मचाऱ्यांवर विविध कारणास्तव दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.

उपरोक्त बाबींचा विचार करता एवढी कामे करुनही विकास कामात मी खोडा घालीत आहे असे म्हणणे चुकीचे होईल व असा अविश्वासाचा प्रस्ताव प्रस्तावित करुन प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण होईल असे माझे मत आहे.

माझा अहवाल / खुलासा सविनय सादर करित आहे, याची नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी, ही विनंती.

**सही /-**
**(डॉ.विद्या गायकवाड)**
**आयुक्त,**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**

**विशेष महासभा ठराव क्रं. १२१८ दि.०१/०८/२०२३**

असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक ०१/०८/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित विशेष महासभेत गणपुर्ती पुर्ण न झाल्याने सन्मा.सदस्य, श्री.अश्विन शांताराम सोनवणे यांनी केलेल्या सुचनेनुसार आजची विशेष महासभा गणपुर्ती अभावी अनिश्चित काळासाठी तहकुब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकुब :-**

| | | |
|---|---|---|
| **उपस्थित सन्मा.सदस्य** | **:-** | **०६** |
| **सुचक** | **:-** | **सोनवणे अश्विन शांताराम** |
| **अनुमोदक** | **:-** | **ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह** |

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीतला सुरुवात करावी.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**